सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.११९/ वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : १३/ ०५ / २०२२

# -: प्रेसनोट :-

## काळाचौकी पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १२/०५/२०२२ रोजी ११:३० वा. सुमारास फिर्यादी श्री. दिलीप ओमकार गुप्ता, वय २९ वर्षे, रा. ठी. रुम नं.५, चाळ नं.२, मोदीशेठ चाळ आंबेवाडी, काळाचौकी, मुंबई हे रुम नं.५, चाळ नं.२, मोदीशेठ चाळ आंबेवाडी, काळाचौकी, मुंबई या ठिकाणी असतांना यातील ०२ अटक आरोपीतांनी आपापसांत संगमनत करून फिर्यादी यांचा भाऊ याचे आरोपीतांचे दुकानातील इसमाबारोबर झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन आरोपीतांनी फिर्यादी यांचा भाऊ प्रदीप यास चाकूने भोकसले तसेच फिर्यादी व त्यांचे आईस सुध्दा मारहाण केली व फिर्यादी यांना छातीवर चाकून भोकसले व फिर्यादी व त्यांच्या भावास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र. क्र. २८४/२२ कलम ३०७, ३२३, ३२४, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.